

# शहानूर नदीवरील पुलावर तातडीने कठडे बसवा!

## अंबापाटी पूल जीर्ण, प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.30 )** – चिखलदरा तालुक्यातील अंबापाटी गावाजवळून जाणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्युडी) प्रमुख रस्त्यावर शहानूर नदीवरील पूल वाहतुकीसाठी महत्त्वाचा आहे. मात्र, या पुलाच्या दोन्ही बाजूंचे सुरक्षा लोखंडी कठडे तुटले असून प्रवाशांच्या सुरक्षिततेवर मोठा धोका निर्माण झाला आहे.

धारणी, हरिसाल, अकोट यांना जोडणारा हा मुख्य मार्ग असून शालेय विद्यार्थी, शेतकरी, मोटारसायकलस्वार, चारचाकी चालक, रुग्णवाहिका तसेच परतवाडा–धारणी बससेवा याच पुलावरून जाते. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे नदीचे पाणी पुलालगत वाहत असून कधी कधी पुलावरूनही पाणी जात आहे. कठडे नसल्याने रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढतो. अपघाताची वाट बघूनच कार्यवाही करायची का? असा सवाल उपस्थित करत सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लोखंडी कठडे बसवून अपघात टाळावा, अन्यथा दुर्घटनेची जबाबदारी शासनावर राहील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# पाण्याची टाकी फुटून 14 वर्षीय आदीवासी विद्यार्थीनी ठार

## पाच विद्यार्थीनी गंभीर ■ विद्यमान आमदाराच्या आश्रमशाळेतील घटना

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती/अचलपूर, ( दि.30 )- चिखलदरा तालुक्यातील नागापूर येथील वसंतराव नाईक आदिवासी आश्रमशाळेत पाण्याची टाकी फुटून 14 वर्षीय आदीवासी विद्यार्थीनी ठार झाली, यामध्ये पाच विद्यार्थीनी गंभीर जखमी झाल्या. ही घटना मंगळवारी सायंकाळी 8 वाजताच्या सुमारास घडली. विशेष म्हणजे ही शाळा मेळघाट विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार केवलराम काळे यांची आहे. खुद्द आमदारांचीच शाळा विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित नाही, तर मतदारसंघातील इतर सरकारी शाळेचे काय हाल असतील हे यावरुनच दिसून पडत आहे. याप्रकरणी संचालकांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी मुलीच्या पालकांकडून करण्यात आली आहे.*







### आश्रमशाळा की, बेशरम शाळा

आदीवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता तत्कालीन केंद्र व राज्य शासनाने आश्रमशाळा ही संकल्पना अस्तित्वात आणली. यामध्ये काही आश्रमशाळा या शासकीय आणि काही अशासकीय परंतू अनुदानित आहे. आमदार केवळराम काळे यांची ही शाळा अनुदानित असल्याचे सांगण्यात येत आहे. शासनाकडून ग्रँड मिळविण्याकरिता अतिशय जीर्ण झालेल्या पाण्याच्या टाकीला रंगरगोटी करुन वापरली जात होती. ऐन नागपंचमीच्या दिवशी टाकीवर हातपाय धुण्याकरिता गेलेल्या विद्यार्थीनींवर पाण्याची ही टाकी काळ बनून सहा विद्यार्थीनींवर कोसळली. ज्यामध्ये एका 14 वर्षीय विद्यार्थीनीची जागीच मृत्यू झाला.

### उच्चस्तरीय चौकशीची मागणी

घटनेची माहिती मिळताच माजी आमदार राजकुमार पटेल, समाजसेवक देवीदास कोगे, पंकज मोरे आदी कार्यकर्त्यांनी घटनास्थळ व रुग्णालयाला भेट देऊन संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला. सभापती रोहित पटेल यांनी प्रशासन व शाळा संस्थेविरोधात तीव्र रोष व्यक्त करत, संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून उच्चस्तरीय चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

### आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

ही घटना आदिवासी भागातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करते. प्रशासनाच्या संवेदनशीलतेवरही संशय निर्माण झाला असून, या प्रकरणावर तातडीने योग्य ती कारवाई होणे गरजेचे आहे, असा एकमुखी सूर स्थानिकांनी व्यक्त केला.

### अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात तणाव

यावेळी विरोधकांनी विद्यमान आमदारांना कैचित पकडत चांगलेच सोलून काढले. दुसरीकडे आ. काळे यांनी अचलपूर पोलिसांकडून सुरक्षेकरिता पोलीस बंदोबस्त मागविला होता. दुपारी उशिरा या विद्यार्थीनीचे पोस्टमार्टम करण्यात आले.



### मृतदेह 12 तास बेवारस

सुमती सोमा जामुनकर (वय 14,रा.बामदेही) असे त्या विद्यार्थीनीचे नाव आहे. इतर विद्यार्थीनींना परतवाडामधील एका खासगी रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे. हिचा मृत्यू झाला. ही घटना केवळ अपघातापुरती मर्यादित न राहता शाळा प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे उदाहरण ठरली आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मृत्यूनंतर तब्बल 12 तासांपर्यंत शाळेतील कोणताही कर्मचारी रुग्णालयात पोहोचला नाही, तसेच मुलीच्या कुटुंबियांनाही माहिती देण्यात आली नाही, असे सांगण्यात आले आहे. दुर्घटनेनंतर सुमतीचा मृतदेह अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात बेवारस अवस्थेत पडून होता. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी घटनास्थळाला भेट देऊन शाळा प्रशासनाच्या बेपर्वाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली. आणखी धक्कादायक म्हणजे, घटनेची माहिती सुमतीच्या पालकांपासून लपविण्यात आल्याचे आरोप करण्यात आले.

# विहिरीत कुजलेल्या अवस्थेत सापडला बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह

## कमरेला बांधले होते दगड

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.30 )** – बेनोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या सावंगा शेतशिवारातील एका विहिरीत सोमवारी (२८ जुलै) दुपारी एका पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, मृतदेहाच्या कमरेला दोरीने दगड बांधलेले आढळल्याने हा प्रकार आत्महत्येचा असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे.

विहिरीतून मृतदेह बाहेर काढल्यानंतर त्याची ओळख संदीप पुंडलिकराव नेरकर (वय ४७, रा. लोणी) अशी पटली.



संदीप नेरकर हे २२ जुलै रोजी कोणालाही काही न सांगता घरातून बाहेर गेले होते व ते परतलेच नाहीत. त्यांच्या बेपत्ता होण्याची नोंद २३ जुलै रोजी बेनोडा पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच बेनोडा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तपासादरम्यान मृतदेहाच्या कमरेला दोरीने दगड बांधलेले दिसले.

त्यामुळे मृत व्यक्तीने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तथापि, नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मृतदेहाचे शवविच्छेदन वरुड उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले. सोमवारी रात्री उशिरा शवविच्छेदन पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द करण्यात आला व त्याच रात्री लोणी येथे अंत्यसंस्कार पार पडले. संदीप नेरकर यांचा कुठल्याही वाद किंवा कौटुंबिक तंट्यात सहभाग नसल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. त्यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलण्यामागील खरे कारण अद्याप अज्ञात आहे. पोलीसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# अमरावतीत 11 वर्षीय मुलीचा भाजून मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**–अलीम नगर येथील गल्ली क्रमांक 2 मध्ये घडलेल्या दुर्दैवी घटनेत 11 वर्षीय मुस्कान परवीन शेख मोहसीबूर हिचा भाजून मृत्यू झाला.

माहितीनुसार, 26 जुलै रोजी मुस्कानची आई चुलीवर स्वयंपाक करत होती. लाकूड ओले असल्याने तिने पेट्रोल टाकून काडी पेटवली. अचानक आग भडकली आणि 6 फूट उंचीवरील प्लास्टिक शीटच्या छताला आग लागली. जळणारी प्लास्टिक शीट मुस्कानवर पडल्याने तिच्या अंगावरील नायलॉनच्या कपड्यांना आग लागली. गंभीर भाजलेल्या मुस्कानला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान 28 जुलै रोजी तिचा मृत्यू झाला. या दुर्घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.या घटनेबाबत नागपुरी गेट पोलिसांनी बीएनएसएस कलम 194 अंतर्गत अपघाती मृत्यूचा गुन्हा नोंदवला असून, तपास सुरू आहे.

# गप्पा गोष्टी हॉटेलवर दर्यापूर पोलिसांची धाड

■ जुगार अड्डुयावर छापा; सहा जण अटकेत

■ एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि. 30 )** – दर्यापूर शहरातील बनोसा येथील गप्पा गोष्टी हॉटेल येथे सुरू असलेल्या जुगार अड्डुयावर दर्यापूर पोलिसांनी मंगळवारी रात्री अचानक छापा टाकत सहा जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान काही संशयितांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी जागेवरून एक लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करत गुन्हा नोंदवला आहे.

29 जुलै रोजी दर्यापूर पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, बनोसा येथील गप्पा गोष्टी हॉटेलमध्ये 15 ते 20 जण एक्का–बादशहा नावाचा पत्त्यांचा जुगार खेळत आहेत. या माहितीच्या आधारे ठाणेदार पोलीस निरीक्षक सुनील वानखडे यांच्या नेतृत्वात पथकाने छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच काही जण पळून गेले, परंतु 6 इसमांना घटनास्थळी पकडण्यात पोलिसांना यश आले. अटकेतील आरोपीमध्ये शेख वसीम शेख हसनु (32, रा. जसपुरा, भातकुली), विनोद सुरेशराव चौधरी (39, रा. जुनी तहसील, दर्यापूर), मोहम्मद इर्शाद अब्दुल रशीद (43, रा. खोलापूर, भातकुली), भुजंग रमेश गुळदे (38, रा. जळमकर कृषी इंडस्ट्रीज, बाभळी), रुपिकेश संजय जळमकर (35, रा. गांधी नगर, बनोसा), सागर उर्फ सोनू अरुण गावंडे (43, रा. राठीपुरा, दर्यापूर) यांच्या ताब्यातून 1 लाख 20 रुपयांचा जुगार साहित्य व रोकड जप्त करण्यात आली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, दर्यापूरचे ठाणेदार पोलिस निरीक्षक सुनील वानखडे यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत पोलिस उपनिरीक्षक रोहित सोनटक्के, पोलिस हवालदार निवृत्ती बरगट, सचिन जाधव, अनिल आडे हे सहभागी होते. पोलिसांकडून दर्यापूर परिसरात अवैध जुगार अड्डुयांविरुद्ध सातत्याने मोहीम राबवली जात असून, कोणत्याही प्रकारचा जुगार चालणार नाही, असा कडक इशारा स्थानिक पोलिसांनी दिला आहे.

# गहाण ठेवलेली दुचाकी विकून फसवणूक, आरोपी अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 30 )** – वडिलांच्या उपचारासाठी 10 हजार रुपयांची गरज भासल्याने एका मजुराने मदतीसाठी दुचाकी गहाण ठेवली. मात्र, हीच गाडी विकून त्याची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणात कोतवाली पोलिसांनी आरोपीला अटक करून 1.52 लाख रुपये किमतीची युनिकॉन दुचाकी जप्त केली आहे. संतोष हातागडे (वय 38, रा. चवरेनगर) यांना 16 जुलै रोजी वडिलांच्या आजारासाठी पैशांची गरज होती. ओळखीचा आकाश राऊत याने मदतीचं आश्वासन देत त्यांना राम बहाळे (रा. कठोरा नाका) याच्याकडे नेले. रामने 10 हजार रुपये देण्याची तयारी दर्शवली, पण त्यासाठी हातागडे यांची युनिकॉन दुचाकी (एमएच 27 डीएक्स 3193) गहाण ठेवण्याची अट घातली. हातागडे यांनी गाडी गहाण ठेवून पैसे घेतले. काही दिवसांनी त्यांनी गाडी परत मागितल्यावर राम बहाळे टाळाटाळ करू लागला. चौकशीत गाडी दुसऱ्याला विकल्याचं समोर आलं. त्यामुळे फसवणूक झाल्याचं लक्षात येताच हातागडे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय दंड विधानाच्या नव्या बीएनएस कलम 316(2) अंतर्गत गुन्हा दाखल केला. 30 जुलै रोजी गुप्त माहितीच्या आधारे राम बहाळे याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून गाडी जप्त करण्यात आली असून तिची किंमत 1.52 लाख रुपये आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

# माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांची प्रदेश काँग्रेस उपाध्यक्षपदी नियुक्ती

■ चांदूर रेल्वेत सत्कार, कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.30 )** – धामणगाव मतदारसंघाचे माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीची घोषणा होताच स्थानिक काँग्रेस कमिटींकडून आनंद साजरा करण्यात आला.

कार्यकर्त्यांनी त्यांच्या भावना प्रकट करताना सांगितले की, प्रा. जगताप यांनी आमदार म्हणून कार्यकाळात सामान्य जनतेच्या कल्याणासाठी, सामाजिक न्यायासाठी आणि क्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे त्यांची ही निवड झाल्याचे मानले जात आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे काँग्रेस



पक्षाला स्थानिक पातळीवर मजबुती मिळाली आहे. यावेळी प्रा.जगताप यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रमात काँग्रेस तालुकाध्यक्ष अमोल होले, शहराध्यक्ष श्रीनिवास सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष शिट्टू सूर्यवंशी यांसह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या वेळी कार्यकर्त्यांनी प्रा. जगताप यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा देत पक्षाच्या उन्नतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# रेती तस्करीविरोधात आवाज उठवल्याने अजयवर तलवारीने प्राणघातक हल्ला

## अभिजीत तायडेने दिली अपहरणाची धमकी, मी आमदाराचा भाऊ आहे असा दावा

### कलम 307 अंतर्गत गुन्हा दाखल करा, अन्यथा उपोषणाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**आसेगांव पूर्णा, दि. ३०** – जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील राजना पूर्णा गावात अवैध रेती तस्करीविरोधात आवाज उठवल्याने समाजसेवक अजय साहेबराव कावरे (वय 26) याच्यावर धारदार तलवारीने प्राणघातक हल्ला करण्यात आला. ही घटना 24 जुलै रोजी घडली असून अजय सध्या अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत आहे.

अभिजीत तायडेची धमकी – मी आमदाराचा भाऊ आहे. हल्ल्यापूर्वी अजयला अभिजीत तायडे नामक इसमाचा फोन आला होता. त्याने अजयला अपहरण करण्याची धमकी देत मी आमदाराचा भाऊ आहे असे सांगितल्याचा धक्कादायक आरोप जखमी अजयने व्हिडिओद्वारे केला आहे. यामुळे ही गुंडगिरी आमदार प्रविण तायडे यांच्या नावावर सुरु आहे का? असा प्रश्न सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

**अनिकेत वाठसह टोळक्याचा हल्ला**

माहितीनुसार, अवैध रेती तस्करीत गुंतलेल्या अनिकेत गंगाधर वाठ (वय 35) याने अजयला फोन करून गावाजवळील पुलाजवळ बोलाविले. ठरलेल्या ठिकाणी पोहोचताच अनिकेतसह मंगेश ढोले, अमन ढोले, काटोलकर व इतर 10 ते 12 जणांनी अजयवर धारदार तलवारीने हल्ला केला. हल्ल्यात अजयच्या डोक्यावर गंभीर जखम झाली असून त्याच्या डोक्याला 50 पेक्षा जास्त टाके टाकावे लागले.

**पोलिसांची हलगर्जी आरोपींना राजकीय पाठबळ?**



जखमी अवस्थेत अजयला आसेगाव पूर्णा पोलिस स्टेशनमध्ये नेण्यात आले, मात्र फिर्याद नोंदविण्यास मोठा विलंब झाला. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, कार्यरत पोलिस अधिकारी मद्यधुंद अवस्थेत होते. याशिवाय, अजयने 10–12 जणांनी हल्ला केल्याचे स्पष्ट सांगूनही केवळ 4 आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच हल्ल्यात तलवार वापरली असतानाही पोलिसांनी तक्रारीत रॉडने मारहाण असा उल्लेख केला. या कारवाईवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### आई छाया कावरे यांचा निवेदनातून रोष

जखमी अजयची आई छाया साहेबराव कावरे यांनी पोलिस अधीक्षक (ग्रामीण) यांच्याकडे निवेदन देऊन भादंवि कलम 307 अंतर्गत गुन्हा दाखल करून तीन दिवसांत आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी फक्त 326 कलमाखाली गुन्हा दाखल केल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. छाया कावरे यांनी इशारा दिला आहे की, जर आरोपींना अटक झाली नाही तर त्या आपल्या जखमी मुलासह पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करतील.

### नागरिकांमध्ये संताप –कोण आका? प्रश्न तीव्र

या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपींना राजकीय पाठबळ असल्याच्या चर्चेमुळे पोलिस प्रशासनावर दबाव असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# थेट अर्ज व मुलाखत

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यालयातील आस्थापना विषयक विवक्षित कामकाजासाठी गट–ब (राजपत्रित) सेवानिवृत्त अधिकारी यांची सेवा कामकाज पूर्ण होईस्तव किंवा 11 महिने यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत घेण्यासाठी आस्थापना विषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या पात्र व ईच्छुक सेवानिवृत्त अधिकारी, गट–ब (राजपत्रित) यांनी आवेदन अर्ज, सर्व मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी दि. 04/08/2025 रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावत्ती यांच्या कार्यालयात पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ, टी.बी. हॉस्पीटलच्या मागे, अमरावती–444602 येथे उपस्थित राहावे. त्यांची नियुक्ती, मानधन व इतर शर्ती शासन नियमाप्रमाणे लागू राहतील.

**( जितेंद्र एन. चौधरी )**
**अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती.**

विमाका./अम/जाहि./३६५/२०२५-२०२६

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# राजकिय पुढाऱ्यांच्या आश्रयात अवैध मुरुम तस्करी





## एकाही गुन्ह्याची नोंद नाही

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )** – चांदुर बाजार तालुक्यात महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरून मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज मुरुमाचे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू आहे, विशेष म्हणजे मुरुमाचे उत्खनन करत असताना परवानगी एका ठिकाणची घेतली जात आहे, मात्र मुरुमाचे उत्खनन दुसऱ्या ठिकाणचे केले जाते, असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या बेकायदेशीर धंद्याला काही स्थानिक राजकीय पुढाऱ्यांचे उघडपणे संरक्षण असल्याचे आरोप होत आहेत.

गेल्या 10-12 वर्षांपासून सुरू असलेल्या या तस्करीत सत्ता बदलली की वाहतूकदारही आपला राजकीय गट बदलतात, त्यामुळे कारवाईचा बोजवारा उडतो. काही अधिकारी आणि खनिज माफिया यांच्या संगनमतामुळे हे अवैध उत्खनन विनाअडथळा सुरू आहे.

### कायदा काय सांगतो ?

गौण खनिज कायद्यानुसार अवैध उत्खननावर बाजारमूल्याच्या तीनपट दंडाची तरतूद आहे. कोणत्याही खासगी किंवा सरकारी जमिनीतून माती, मुरुम, दगड, गारगोटी यांसारख्या गौण खनिजाचे उत्खनन करण्यासाठी परवाना आवश्यक आहे. परवाना न घेता उत्खनन केल्यास खाण व खनिज विनियमन व विकास अधिनियम 1957 च्या कलम 21(1) ते (5) नुसार दंड आकारला जातो. अवैध वाहतुकीसाठी 3200 रुपये दंडाची तरतूद आहे.

### एकही गुन्ह्याची नोंद नाही!

चोरीचा मुरुम अमरावती जिल्ह्यातील एकाच तालुक्यात न थांबता आजूबाजूच्या भागातही पोहोचतो. तरीही ब्राम्हणवाडा, शिरजगाव कसबा, परतवाडा, आसेगाव, अचलपूर, चांदूरबाजार, शिरखेड या पोलीस स्टेशन हद्दीत 2015 पासून आजपर्यंत अवैध मुरुम खनिजाची एकही गुन्हा नोंद नसल्याने सांगितले जात आहे.

### भरारी पथक आणि दक्षता समिती नावालाच


अवैध मुरुम, माती, वाळू उपसा रोखण्यासाठी महसूल विभागाने 8 पथके तयार केली आहेत. यात तहसीलदार, सहायक मंडळ अधिकारी आणि 16 तलाठ्यांचा समावेश असून, मंडळ अधिकारी या पथकाचे प्रमुख असतात. आवश्यकतेनुसार तहसीलदारही कारवाईसाठी उपस्थित असतात. मात्र प्रत्यक्षात हे पथक केवळ कागदावरच असल्याचे स्पष्ट दिसते. मुरुम माफियांचा धिंगाणा सुरू असताना या पथकाने केलेल्या कारवाईचे नावमात्र रेकॉर्ड आहे. जिल्हा नियंत्रण समितीही कार्यक्षम न ठरण्याची कबुली स्थानिक नागरिक देतात.

### प्रशासनाच्या समोर अनेक अडचणी

काही अधिकाऱ्यामध्ये कारवाई करण्याची इच्छा असली तरी अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. ज्यामध्ये जिल्ह्यात गौण खनिज कारवाईकरिता स्वतंत्र पथक नाही; विद्यमान यंत्रणा अपुरी, कायमस्वरूपी जिल्हा खनिकर्म अधिकारी नाही, प्रभारी अधिकाऱ्याकडे एकाचवेळी 13 जिल्ह्यांचा पदभार, महसूल विभागाच्या भरारी पथकाला मतदार यादी, निवडणुका, महसुली प्रकरणे, जमिनीचे व्यवहार, कोर्टकचेरी, माहिती अधिकार, ई-चावडी आदी 310 कामांचा ताण, महसूल विभाग, पोलीस आणि आरटीओ यांच्यात समन्वयाचा अभाव, तक्रारी आल्यावरच कारवाई होते, तीही अपुरी.

# चांदूर बाजारातील मुख्य रस्त्याला अतिक्रमणाचा वेढा

## अपघात झाल्यास जबाबदारी कोणाची ?



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि.30 )** – चांदूर बाजार शहरातील मुख्य रस्त्यांची परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत आहे. राज्य मार्ग, राष्ट्रीय महामार्ग आणि नगरपरिषद हद्दीत येणाऱ्या स्थानिक रस्त्यांच्या कडेने मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. या अतिक्रमणामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली असून वाहतुकीला मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. विशेषत: चांदूर बाजार ते वलगाव या राज्य मार्गावर एस.टी. डेपो पासून ते शिरजगाव बंड स्टॉपपर्यंत रस्त्याच्या दोन्ही कडेला दुकाने थाटली गेली आहेत. दुकानांसमोर वाहनचालक पार्किंग करीत असल्याने रस्त्यावर प्रचंड गर्दी होते. नागरिकांच्या चर्चेतून असे स्पष्ट होत आहे की शहर अतिक्रमणाने वेढले गेले आहे, तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्यापही अतिक्रमणविरोधी मोहीम राबवलेली नाही. परिणामी, अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

याचबरोबर नानोरी फाटा ते जमापूरपर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गावरही अनधिकृत पार्किंग आणि दुकाने उभारण्यात आली आहेत. जयस्तंभ ते पोलीस स्टेशन, नेताजी चौक ते बेलोरा चौक या भागातही सारखीच परिस्थिती आहे. रस्त्यांची अवस्था दयनीय झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. विकासाच्या कामाला अतिक्रमणाचे ग्रहण लागले असून प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे.

पोलीस स्टेशन ते परसोडा फाटा या रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. मात्र, कामाची गती अत्यंत संथ असून ड्रेनेज नाल्यांचे काम अपूर्ण आहे. 1390 लाख रुपये निधी प्राप्त असूनही रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. अप्रोच रोड आणि ड्रेनेज नाल्यांना सुसूत्रता नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. दुकानदारांपुढेच नाल्यांचे काम केल्याचा आरोप व्यावसायिकांनी केला आहे. अतिक्रमण केवळ रस्त्यापुरते मर्यादित नसून अनेकांनी व्यापारी स्थळे बेकायदेशीररीत्या विक्रीस काढली आहेत. ग्रामपंचायत शिरजगाव बंड याकडे दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे. एकाने दुकान सोडले तरी दुसरा व्यापारी येऊन बसत असल्याने अतिक्रमण वाढतच आहे. या सर्व परिस्थितीमुळे सुज्ञ नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने अतिक्रमणविरोधी मोहीम राबवावी, अशी मागणी केली आहे.

> अतिक्रमणमुक्त रस्ते करण्याचा माझा संकल्प आधीच आहे. यासाठी सुरक्षा दृष्टीने प्रस्ताव अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षकांकडे पाठविण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगर परिषद हद्दीत रस्त्यांवरील अतिक्रमण लवकरच हटवले जाईल. तसेच चिलाटी नाला ते परतवाडा या राष्ट्रीय महामार्गावरील बंद असलेल्या लाईटबाबतही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.
>
> 
>
> **प्रवीण तायडे,**
> **आमदार अचलपूर मतदारसंघ**

# रोहयोची देयके वेळेत अदा करण्यासाठी उपाययोजना आवश्यक

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 ) :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत (मनरेगा) अंतर्गत मजुरांचे देयके वेळेत अदा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मनरेगाच्या कामकाजावरील आढावा बैठक झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवनसंरक्षक सुमितकुमार, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांच्यासह तहसीलदार आणि गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

### देयकासाठी पोस्ट पेमेंट बँक खाते

मजुरांचे देयक थकू नये म्हणून पोस्ट पेमेंट बँकेची खाती उघडावीत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. या खात्यांमुळे मजुरांना अपघात विमा संरक्षण देखील मिळेल. तसेच आधार सिडींग आणि बँक खात्याशी आधार जोडणे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### मस्टर वेळेत जमा करण्याचे आदेश

मनरेगामध्ये मस्टर देण्याचे अधिकार रोजगार सेवकांकडे ठेवू नयेत, हे अधिकार तहसीलदारांच्या अखत्यारीत असावेत, असे स्पष्ट करण्यात आले. मस्टर दिल्यानंतर सात दिवसांच्या आत ते जमा करणे बंधनकारक आहे. मस्टर वेळेत जमा न केल्यास देयक प्रक्रियेत विलंब होतो व जिल्ह्याची कामगिरी घसरते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### 1 ऑगस्टपासून 'एक पेड माँ के नाम' उपक्रम

येणाऱ्या 1 ऑगस्टपासून वृक्षलागवडीसाठी 'एक पेड माँ के नाम' उपक्रम सुरू होणार आहे. त्यामुळे वृक्षलागवडीची कामे मनरेगाअंतर्गत मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावीत, असे त्यांनी निर्देशित केले. मनरेगामध्ये अकुशल मजुरांचा निधी नियमित येतो, त्यातून देयके तातडीने अदा करावीत. कुशल मजुरांच्या कामांसाठी निधी मिळाल्यावर ती कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# आश्रम शाळेतील प्राथमिक शिक्षकाकडे माध्यमिक मुख्याध्यापकांचा प्रभार

## आदिवासी प्रकल्प कार्यालयाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह



***महासागर प्रतिनिधी***

***धारणी,( दि.30 )** – येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय यांच्या अंतर्गत असलेल्या आडनदी येथील आदिवासी आश्रम शाळा (एकलव्य विद्यालय, चिखलदरा) येथे गंभीर प्रशासकीय अनियमितता उघड झाली आहे. नियमित मुख्याध्यापिका कार्यरत असतानाही त्यांच्या अधिकारातून प्रभार काढून एका प्राथमिक शिक्षकाकडे सोपविण्यात आला, हा प्रकार धक्कादायक ठरला आहे.*

### कारवाईची मागणी

या प्रकारामध्ये नियमांचे उघडपणे उल्लंघन झाले असून, प्रकल्प अधिकारी कार्यालयाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिक, शिक्षक संघटना आणि पालकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. या सर्व घटनांमुळे आदिवासी आश्रम शाळांच्या प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### प्रतिनियुक्तीचे पत्र संशयास्पद

सर्व नियमांना धाब्यावर बसवत, संबंधित शिक्षकाने प्रकल्प अधिकारी कार्यालयातून मुख्याध्यापक म्हणून प्रतिनियुक्तीचे पत्र आणले असल्याचा आरोप आहे. हे पत्र कोणत्या आधारावर व कोणाच्या मंजुरीने काढण्यात आले, हा प्रश्न शिक्षक व पालकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

### निर्माण झालेले गंभीर प्रश्न

- नियमित मुख्याध्यापिका असताना प्रभार प्राथमिक शिक्षकाकडे का दिला ?
- बदली आदेशाचे उल्लंघन करूनही कारवाई का झाली नाही ?
- प्रतिनियुक्तीचे पत्र बनविण्यामागे कोणाचा हस्तक्षेप आहे ?

### बदलीनंतरही शिक्षक रूजू नाहीत

सदर प्राथमिक शिक्षकाची बदली डोमा येथील आदिवासी आश्रम शाळेत करण्यात आली होती. मात्र, बदली आदेशाला महिनाभर उलटूनही संबंधित शिक्षक डोमा येथे रूजू झाले नाहीत. ते अद्याप आडनदी शाळेतच कार्यरत राहिले, हे नियमांचे उल्लंघन ठरते. बदलीनंतर माध्यमिक विभागातील नवीन मुख्याध्यापिका नियुक्त होऊनही प्राथमिक शिक्षकाने त्यांना प्रभार तसेच कार्यालयीन चाव्या देण्यास नकार दिला. परिणामी, शाळेचे प्रशासन ठप्प झाले.

# विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंगसाठी सीड योजना

**अमरावती** – केंद्र शासनातर्फे डीएनटी, एनटी आणि एसएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मोफत कोचिंगसाठी सीड योजना सुरु केली आहे. या योजनेत पात्र विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोफत कोचिंगची सुविधा मिळणार आहे. योजनेसाठी अर्जदार हा डीएनटी, एनटी, एसएनटी प्रवर्गातील विद्यार्थी असावा. विद्यार्थी बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 8 लाखांपेक्षा कमी असावे. राज्य किंवा केंद्र शासनाच्या कोणत्याही कोचिंग योजनेचा लाभ घेतलेला नसावा. पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी 1 लाख 20 हजार लाभ मिळणार आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत 3 ऑगस्ट 2025 आहे. विद्यार्थ्यांना buddyy study.com या वेबसाईटवर नोंदणी करावी लागणार आहे.

# सातपुड्याच्या पायथ्याशी 'बदामी डोक्याचा राघू'

## अमरावतीसाठी पहिली नोंद



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट ( दि.30 )** – अमरावती जिल्ह्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या बेलखेडा गावाजवळ दुर्मिळ पक्षी 'बदामी डोक्याचा राघू' (Chestnut-headed Bee-eater – Merops leschenaulti) आढळून आला आहे. या प्रजातीची जिल्ह्यासाठी ही पहिलीच नोंद ठरली आहे.

हा पक्षी डोके व मान बदामी, गाल पिवळे, तर शरीराचा उर्वरित भाग हिरव्या रंगाचा असतो. नाजूक काळी निमुळती चोच हे त्याचे वैशिष्ट्य आहे. नर आणि मादी दिसायला सारखेच असतात व सहसा कळपाने फिरतात. जंगलांच्या पायथ्याशी, रस्त्यांच्या कडेच्या झाडांवर किंवा विजेच्या तारांवर बसून किडे, कीटक व मधमाशा टिपताना हे पक्षी आढळतात. भारतात हा पक्षी मुख्यत: हिमालय, पूर्व व पश्चिम घाटात आढळतो. प्रजननानंतर हा स्थानिक तसेच उत्तर-दक्षिण स्थलांतर करतो. अमरावतीतील ही नोंद जुलै महिन्याच्या अखेरीस झाली असून, पक्ष्याच्या स्थलांतर अभ्यासासाठी महत्त्वाची मानली जात आहे.

ही नोंद परतवाडा येथील पक्षी निरीक्षक डॉ. रणजीत चित्रकार यांनी केली. बेलखेडा जवळ रस्त्याच्या कडेला निरीक्षण करताना त्यांनी हा पक्षी पाहिला व छायाचित्राद्वारे खातरजमा केली. अमरावती जिल्ह्यात यापूर्वी राघू प्रजातीतील वेडा राघू (Green Bee-eater), निळा शेपटीचा राघू (Blue-tailed Bee-eater) आणि निळ्या गालाचा राघू (Blue-cheeked Bee-eater) यांची नोंद होती. आता या यादीत बदामी डोक्याचा राघू हा नवीन सदस्य जोडला गेला आहे. डॉ. रणजीत यांनी याआधीही अनेक दुर्मिळ पक्ष्यांच्या नोंदी केल्या असून, यावर्षीच्या सुरुवातीला त्यांनी 'वॉटर पिपिट' (पाण तीरचिमणी) या पक्षाची महाराष्ट्रातली पहिली नोंद केली होती. या शोधामुळे सातपुड्याच्या परिसरातील जैव विविधतेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

# दादासाहेबांचे व्यक्तिमत्व परिस्पर्श समान : ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर

## स्व. दादासाहेब काळमेघ यांचा 28 वा पुण्यस्मरण सोहळा






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 30 )**– स्वत:च्या कर्तृत्वाने इतरांना घडविणारे आणि समाजाला कर्मयोगाचा नवा मार्ग दाखविणारे स्व. दादासाहेब काळमेघ यांचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने परिस्पर्श समान असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार व व्याख्याते ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर यांनी केले. स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित 28 व्या पुण्यस्मरण सोहळ्यात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

महाराज पुढे म्हणाले, विज्ञान आणि अध्यात्माच्या संगमातून दादासाहेबांनी समाजाच्या उत्थानासाठी कार्य केले. त्यांनी 'जे का रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले' या संत तुकारामांच्या वचनाची खरी सिद्धता आपल्या कार्यातून घडवून आणली. त्यांचे जीवनच विचारांच्या वारशाचे प्रतीक आहे आणि हा सोहळा त्यांच्या विचारांचे स्मरण करून नवी पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प आहे.

मातोश्री विलमाताई देशमुख सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्याचे अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी भूषविले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, दादासाहेब काळमेघ यांनी आपल्या कार्यकाळात शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रचंड परिश्रम घेतले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा संस्थेला दिशा देणारा ठरेल. या कार्यक्रमाला नागपूर विद्यापीठाचे डॉ. रामदास माहोरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, भैयासाहेब पुसदेकर, केशवराव मेतकर, डॉ. विजय ठाकरे, प्राचार्य डॉ. अंबादास कुलट यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. सर्व वक्त्यांनी दादासाहेबांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला.



स्मरण सोहळ्यात स्व. दादासाहेब व स्व. प्रमिलाताई काळमेघ यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हेमंत काळमेघ यांनी केले, संचालन डॉ. मंदा नांदुरकर यांनी केले तर आभार डॉ. राजेंद्र तायडे यांनी मानले.


## जाहिर सुचना

माझे अशील श्री असलम शाह कासम शाह यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदी खत दि. २४/०९/२०२० र.द.क्र. ३७०४ व दि. १३/१२/२०१८ र.द.क्र. ४८९३ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणास सापडली असल्या किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याद्वारे सर्वास कळविण्यात येते की, या मिळकती बाबत वरील दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करू नये व केल्यास माझे अशील होणाऱ्या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ७ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतचे वर्णन

सदर मिळकत ही म.न.पा. अमरावती व दु.नि. अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा शे.स.क्र1 ४/४, प्लॉट क्र. ३/B-१ याचे क्षेत्रफळ ६७.५० चौ.मि. (७२६.५ चौ.फूट) यावर रहाते घर, मौजे गांभिरपूर प्रगणे बडनेरा, ता. अमरावती जि. अमरावती याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- रोड
पश्चिमेस :- डी.एड. कॉलेजची भिंत
उत्तरेस :- प्लॉट क्र. ३/B-२
दक्षिणेस :- प्लॉट क्र. ४/A

शिक्का

**पत्ता :- ॲड. वैभव न. काकिर्डे ॲन्ड,**
**१९, हरिओम कॉलनी, संताजी नगर,**
**अमरावती ९०७३८२१००१**

